शिवाजी विद्यापीठ
तक्रार निवारण समिती
कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं.०८/२०२४**

| | | |
|---|---|---|
| डॉ.भरत बजरंग बल्लाळ<br>६९/३, शुक्रवार पेठ, कराड,<br>जि.सातारा ४१५११० | } | तक्रार अर्जदार |

**विरूध्द**

| | | |
|---|---|---|
| १. भारती विद्यापीठ, भारती विद्यापीठ भवन,<br>लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे ४११०३०<br><br>२. डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली,<br>१९,सांगली आष्टा रोड, झाशी कॉलनी, सांगलवाडी<br>सांगली ४१६४१६ | } | वि.प. |

भारती विद्यापीठ, पुणे या शिक्षण संस्थेचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलवाडी, सांगली यांचेकडील शिक्षक डॉ.भरत बजरंग बल्लाळ यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२६/०८/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये तक्रारदार यांनी खालीप्रमाणे तक्रार नमूद केली आहे.

**तक्रारीचे स्वरूपः**

दि.२२/०७/२०२४ पर्यंत डॉ.संजय विष्णू पोरे हे कडेगाव येथील मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम, कन्या महाविद्यालय, कडेगाव येथे रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. या दिनांकापर्यंत त्यांचा डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांचेशी काहीही संबंध नव्हता. असे असतानाही डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगली येथील प्राचार्यपद बदलीने रिक्त झाले असताना महाविद्यालयातील माझी दि.०६/०९/१९९३ ची सेवाजेष्ठता, संस्थेने पूर्वग्रहदुषित व आकसाने डावलून, डॉ.संजय विष्णू पोरे यांच्या महाविद्यालयातील पदाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची मान्यता नसतानाही, त्यांची प्रभारी प्राचार्य म्हणून नियमबाहय नेमणूक केली. सदरची नेमणूक करण्यासाठी तत्कालीन प्राचार्य डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय येथे प्रभारी प्राचार्य म्हणून झालेली नियुक्ती रद्द होवून शासकीय निर्देशानुसार ती नियुक्ती मला मिळावी, ही तक्रार निवारण समितीस प्रार्थना. या संदर्भात दि.२४/७/२०२४ रोजी ३० दिवसांची मुदत टाकून तक्रार अर्ज १. मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य २. संचालक, उच्च शिक्षण ३. मा.विभागीय उपसंचालक उच्च शिक्षण कोल्हापूर ४. मा.

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ५. मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ यांना सादर केला होता. प्रतिसाद न मिळाल्याने सदरचा तक्रार अर्ज दाखल करून, न्याय मिळावा ही विनंती.

**संस्थेचा अभिप्राय :**

वरील डॉ. भरत बजरंग बल्लाळ यांचे म्हणणे सर्वस्वी चुकीचे व मुद्याला/ वस्तूस्थितीला अनुसरून नाही. प्रा. डॉ.संजय पोरे यांची बदली संस्थेने २९ जून २०२४ च्या संदर्भ क्रं. बीव्ही/सीओ/अडॅमिन/६४७६/२०२४-२०२५ दि.२९ जून २०२४ च्या पत्रान्वये यांची बदली मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव येथून डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे दि.०१ जुलै २०२४ पासून करण्यात आलेली होती. सदर बदली नुसार ते सांगली येथील महाविद्यालयात दि. २१ जुलै २०२४ रोजी कडेगाव येथून कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त होवून दि.२२ जुलै २०२४ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी सांगली येथे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. त्या वेळेला डॉ. डी.जी.कणसे हे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथील महाविद्यालयाचे प्राचार्य होते यात नियमबाहय काहीही नाही. तसेच प्रशासकीय सोयीसाठी बदली करणे हा संस्थेचा अधिकार आहे. तसेच डॉ.डी.जी.कणसे यांची बदली संस्थेचे बीव्ही/सीओ/अडॅमिन/६४७६/२०२४-२०२५ दि.२९ जून २०२४ नुसार दि.०१/०७/२०२४ पासून बदली डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथून मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव येथे करण्यात आलेली होती. परंतू, प्रशासकीय सोयीसाठी दि. २२ जुलै २०२४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त करून ते दि.२३ जुलै २०२४ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव येथे कामावर रूजू झाले. सबब यात नियमबाहय काहीही नाही.

तसेच प्रा. डॉ. संजय विष्णू पोरे हे संस्थेमध्ये दि.०१/०७/१९९१ पासून शिवाजी विद्यापीठाची मान्यता प्राप्त प्राध्यापक आहेत व डॉ. भरत बजरंग बल्लाळ हे दि.०६/०९/१९९३ पासून मान्यताप्राप्त प्राध्यापक आहेत. संस्थेमधील सेवाजेष्ठतेच्या निकषानुसार प्रा.डॉ.संजय विष्णू पोरे हे डॉ. भरत बजरंग बल्लाळ यांच्यापेक्षा सेवाजेष्ठ आहेत. प्रा. डॉ.संजय विष्णू पोरे यांच्या बदली मान्यतेच्या प्रस्तावाबददलही शिवाजी विद्यापीठाकडे मान्यतेची कार्यवाही चालू आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

वरील डॉ. भरत बजरंग बल्लाळ यांचे म्हणणे सर्वस्वी चुकीचे व मुद्याला/ वस्तूस्थितीला अनुसरून नाही. प्रा. डॉ.संजय पोरे यांची बदली संस्थेने २९ जून २०२४ च्या संदर्भ क्रं.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

बीव्ही/सीओ/ॲडमिन/६४७६/२०२४-२०२५ दि.२९ जून २०२४ च्या पत्रान्वये यांची बदली मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव येथून डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे दि.०१ जुलै २०२४ पासून करण्यात आलेली होती. सदर बदली नुसार ते सांगली येथील महाविद्यालयात दि. २१ जुलै २०२४ रोजी कडेगाव येथून कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त होवून दि.२२ जुलै २०२४ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी सांगली येथे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. त्या वेळेला डॉ. डी.जी.कणसे हे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथील महाविद्यालयाचे प्राचार्य होते यात नियमबाहय काहीही नाही. तसेच प्रशासकीय सोयीसाठी बदली करणे हा संस्थेचा अधिकार आहे. तसेच डॉ.डी.जी.कणसे यांची बदली संस्थेचे बीव्ही/सीओ/ॲडमिन/६४७६/२०२४-२०२५ दि.२९ जून २०२४ नुसार दि.०१/०७/२०२४ पासून बदली डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथून मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव येथे करण्यात आलेली होती. परंतू, प्रशासकीय सोयीसाठी दि. २२ जुलै २०२४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त करून ते दि.२३ जुलै २०२४ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव येथे कामावर रूजू झाले. सबब यात नियमबाहय काहीही नाही.

तसेच प्रा. डॉ. संजय विष्णू पोरे हे संस्थेमध्ये दि.०१/०७/१९९१ पासून शिवाजी विद्यापीठाची मान्यता प्राप्त प्राध्यापक आहेत व डॉ. भरत बजरंग बल्लाळ हे दि.०६/०९/१९९३ पासून मान्यताप्राप्त प्राध्यापक आहेत. संस्थेमधील सेवाजेष्ठतेच्या निकषानुसार प्रा.डॉ.संजय विष्णू पोरे हे डॉ. भरत बजरंग बल्लाळ यांच्यापेक्षा सेवाजेष्ठ आहेत. प्रा. डॉ.संजय विष्णू पोरे यांच्या बदली मान्यता सोबत जोडली आहे. तसेच त्यांच्या प्रभारी प्राचार्य पदाच्या मान्यतेचा प्रस्ताव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदाराने दाखल केलेल्या आणि भारती विद्यापीठ संस्था स्तरावर तयार करण्यात आलेले सेवाज्येष्ठता यादीचे अवलोकन करता, ही बाब प्रकर्षाने दिसून येते की, तक्रारदाराची नेमणूक डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली या महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून आहे. गैरअर्जदार क्र. २ डॉ. पोरे यांची नेमणूक या महाविद्यालयात प्राध्यापक या पदावर बदलीने झालेली आहे. हया बाबत कोणाचा उजर नाही. संस्थेने मांडलेल्या म्हणण्यामध्ये गैरअर्जदार क्र. २ डॉ. पोरे हे या महाविद्यालयात जेष्ठ प्राध्यापक आहेत. नेमणूकीनेदेखील डॉ. पोरे हे तक्रारदाराच्यापेक्षा ज्येष्ठ आहेत. सहयोगी प्राध्यापक हे पद प्राध्यापक पदापेक्षा निम्न स्तरावर आहे. डॉ. पोरे यांची बदली दि. २९/०६/२०२४ च्या आदेश क्र.बीव्ही/सीओ/ॲडमिन/६४७६/२०२४-२०२५ दि.२९ जून २०२४

या आदेशाने भारती विद्यापीठ या संस्थेच्या मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव, जिल्हा सांगली या महाविद्यालयातील प्राध्यापक या पदावरून त्याच संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे प्राध्यापक म्हणून बदली केलेली आहे. तक्रारदाराने आमचे लक्ष दि. २९/०६/२०२४ च्या आदेश क्र.बीव्ही/सीओ/ॲडमिन/६४७६/२०२४-२०२५ या आदेशाकडे वेधले. सदर आदेशात गैरअर्जदार क्र. १ भारती विद्यापीठाने तक्रारदारास डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली या महाविद्यालयामध्ये प्रभारी प्राचार्य म्हणून दि.०१/०७/२०२४ पासून नेमलेले आहे. तक्रारदाराचे कथनानुसार ज्याअर्थी गैरअर्जदार डॉ.पोरे हे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे दि. २२/०६/२०२४ रोजी रूजू झाले. त्याअर्थी त्या तारखेअगोदर ते त्या महाविद्यालयात रूजू नव्हते. सबब त्यांची नेमणूक प्रभारी प्राचार्य म्हणून दि. ०१/०७/२०२४ पासून करता येवू शकत नव्हती. सबब सदरचा आदेश आणि गैरअर्जदार क्र. २ यांची प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक ही बेकायदेशीर आहे तसेच ते स्वतः त्या महाविद्यालयात ज्येष्ठतम असलेने त्यांना डावलण्याकरिता जाणूनबुजून संस्थेने गैरअर्जदार क्र. २ यांची नेमणूक यांना प्र. प्राचार्य बेकायदेशीरीत्या नेमली आहे. तक्रारदार यांचे असे ही कथन होते की, ही सर्व कागदपत्रे संस्थेने मागच्या तारखा टाकून खोटी कागदपत्रे तयार केलेली आहेत.

ही समिती ही बाब स्पष्ट करू इच्छिते की, कागदपत्रे खोटी तयार केली आहेत किंवा तक्रारदाराचा हक्क पूर्वग्रहाने प्रेरित होवून संस्थेने डावलला आहे, हया बाबींवर निर्णय देणे हया समितीच्या सीमित अधिकार क्षेत्रात येत नाही. त्याकरिता तक्रारदारांना वेगळे फोरम/मंच उपलब्ध आहेत. दुसरे असे की दि.२९/०६/२०२४ रोजी जाबदार क्र. २ डॉ. पोरे यांची बदली डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे करतानाच त्याच दिवशीच्या वेगळया क्रमांकाचा आदेश पारित करून डॉ. पोरे यांना डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली हया महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य म्हणून नेमले यामध्ये गैरकायदेशीर काही आहे असे या समितीस वाटत नाही. जास्तीत जास्त त्या आदेशाला एक कार्यालयीन आदेश असे मानले जावू शकते. प्रभारी प्राचार्य ही नेमणूक काही कायम (Substantive) होवू शकत नाही. गैरअर्जदार क्र. २ डॉ. पोरे हे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून पदभार स्विकारतील त्यादिवशी ते प्राध्यापक या पदाच्या सेवाज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठतम प्राध्यापक होतात. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.नियुक्ती ३४४/१११/मशि ५ दि.१५ मार्च २०१२ हया निर्णयानुसार अतिरिक्त कार्यभार हा ज्येष्ठतेनुसार द्यावा व हयासंबंधी विविक्षित नियम नसले तरी प्रघाताने तो ज्येष्ठतम पात्र कर्मचा-याला दिला जातो. हया प्रघाताचा अवलंब करावा अशी सूचना आहे. त्यानुसार पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे गैरअर्जदार क्र. २ डॉ. पोरे हे ज्येष्ठतम पात्र प्राध्यापक

ठरतात. त्यामुळे त्यांना प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक दिली आहे ती वर नमूद केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे आणि त्यात नमूद केलेल्या प्रघाताप्रमाणे योग्य असलेचे या समितीच्या निदर्शनास येते. दुसरे असे की, जेव्हा तक्रारदार हे स्वतः सहयोगी प्राध्यापक आहेत, तेव्हा त्यांना प्राध्यापक या संवर्गातील पात्र शिक्षकास प्रभारी प्राचार्य नेमला म्हणून याबाबत त्यांना उजर करणेचा अधिकार येत नाही. तसेही पाहता, प्रभारी प्राचार्य पदाचा पदभार नियमानुसार कोणास द्यावा ही बाब सर्वस्वी गैरअर्जदार क्र. १ संस्था यांच्या अखत्यारीतील आहे. तक्रारदाराने संस्थेविरूध्द् आपल्या युक्तीवादामध्ये ब-याच तक्रारी केल्या आहेत. परंतू त्या तक्रारी या समितीच्या सीमित कार्यकक्षे बाहेरच्या आहेत. त्यामुळे त्याचा विचार या समितीस करता येणार नाही.

सबब उपलब्ध कागदपत्रांवरून गैरअर्जदार क्र. २ डॉ. पोरे यांची प्रभारी प्राचार्य पदावरती केलेली कृती तक्रारदार तक्रार करतात त्यानुसार गैर नसल्याचे या समितीचे मत आहे. त्याबाबत तक्रारदाराला उजर करण्याचा कोणताही अधिकार नाही. म्हणून प्रस्तुतची तक्रार खारीज करावी लागेल. असे तक्रार निवारण समितीचे मत आहे. सबब समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रार खारीज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 21 DEC 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)